**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी**
**बांधकाम विभाग**

प्रस्तावना :-

**विषय :- भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका हद्दीतील वॉर्ड क्र.०४ (क) आमपाडा येथे मुन्ना शेठ घर नं.५३३/१ ते घर नं.१४४ पर्यंत कॉक्रिट रस्ता तयार करणे व ईतर ठिकाणी पेव्हरब्लॉक बसविणे.**

उपरोक्त विषयांकित कामी अंदाजपत्राकीय रक्कम रु.६९,९९,४५०/- करिता ई-निविदा सुचना क्र. १२६/२०२४-२५, टेंडर नं. ११२२७८६ दिनांक १२/१२/२०२४ ते २६/१२/२०२४ रोजी दु.४.०० वाजे पर्यंत बी-१ पध्दतीची ई निविदा मागविण्यात आली आहे. या कामी २ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. दि.३१/१२/२०२४ रोजी लिफाफा १ तांत्रिक बीड उघडण्यात आली. सदरच्या निविदांचे छाननी अंती दस्तऐवज पुर्ण असल्यामुळे दोनही निविदा, निविदा समितीने पात्र ठरविण्यात आल्या. लिफाफा २ फायनानशियल बीड दिनांक ०९/०१/२०२५ रोजी दु./साय. ०४.४६ मि.उघडण्यात आली असून एकूण प्राप्त २ निविदांचा तौलनिक दर तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदाकाराचे नांव | निविदेतिल दर (टक्केवारी) | निविदेतील दराची रक्कम |
|---|---|---|---|
| **१** | **मे.हिंदुस्तान इंटरप्रायजेस, भिवंडी** | **अंदाजपत्रकीय दराने** | **६९,९९,४४९.५४५** |
| २ | मे.अचिंत्य कंन्स्ट्रक्शन कंपनी पनवेल, जि.रायगड | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.००० टक्के जादा दराने | ७०६९४४४.०४० |

उपरोक्त तौलनिक तक्त्या नुसार मे.हिंदुस्तान इंटरप्रायजेस, ता.भिवंडी, जि.ठाणे यांची निविदा सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दराने रक्कम रु.६९,९९,४४९/- (रु.एकोनसत्तर लाख नव्यांनवद हजार चारशे एकोनपन्नास मात्र) इतक्या खर्चाची निविदा संविदा करणे कामाच्या प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करणे कामी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रं. :** 034 **दिनांक :-** 4/02/२०२५

मे.हिंदुस्तान इंटरप्रायजेस, भिवंडी यांची निविदा सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दराने रक्कम रु.६९,९९,४४९/- (रु.एकोनसत्तर लाख नव्यांनवद हजार चारशे एकोनपन्नास मात्र) च्या खर्चाची निविदा मंजुरीस शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२) नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ (१अ) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका हद्दीतील वॉर्ड क्र.०४ (क) आमपाडा येथे मुन्ना शेठ घर नं.५३३/१ ते घर नं.१४४ पर्यंत कॉक्रिट रस्ता तयार करणे व ईतर ठिकाणी पेव्हरब्लॉक बसविणे याकामी सर्वात कमी दराचे निविदाकार मे.हिंदुस्तान इंटरप्रायजेस, भिवंडी यांचे समवेत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करण्यास मंजुरी देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका.**